
# Academic Year (2021-22)

## 7.2 Best Practices



## Academic Year (2021-22)






Vidya Vikas Mandal's
**Sitaram Govind Patil Arts, Science and Commerce College,**
**Sakri Tal. Sakri Dist. Dhule 424 304**

विद्या विकास मंडळाचे,
**सिताराम गोविंद पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,**
**साक्री ता. साक्री जि. धुळे ४२४ ३०४**

NAAC ACCREDITED

Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

Website : www.sgpcsakri.com | Email : vidyavikas2006@rediffmail.com | Ph : 02568-242323

## Academic Year (2021-22)






**महासमर** 8/3/2022

साक्रीत महिलादिनाच्या कार्यक्रमात मंगला पाटील यांचे प्रतिपादन

# महिलांनी जबाबदाऱ्यांचे कर्तव्यभान ठेवत स्वयंविकास साध्य करावा

महासमर न्यूज फोरम

**साक्री ।** समाजातील सर्व महत्वाच्या जबाबदाऱ्या सक्षम व खंबीरपणे महिला निभावतात, कुटुंब व समाजातील या जबाबदाऱ्यांचे कर्तव्यभान ठेवत असतानाच, महिलांनी स्वयंविकास देखील साध्य करावा असे आवाहनात्मक प्रतिपादन मंगला पाटील यांनी केले. विद्या विकास मंडळ साक्रीच्या सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री येथे विद्या विकास मंडळ महिला गौरव समिती व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात धुळे जिल्हा परिषदेच्या शिक्षण व आरोग्य सभापती आणि विद्याविकास मंडळाच्या अध्यक्ष मंगला सुरेश पाटील अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून साक्री नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा जयश्री पवार, त्रिमूर्ती शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा डॉ मंगला देसले, व सौ. मालती सोनवणे उपस्थित होत्या.

मंगला पाटील बोलताना पुढे म्हणाल्या की, महिला एकाच वेळी विविध भूमिका व जबाबदाऱ्या पार पाडत असतात. या जबाबदाऱ्या पार पाडत असतानाच शिक्षण व आरोग्या संबंधीही त्यांनी सजग राहून व्यवसाय,नोकरी, राजकारण, अशा वेगवेगळ्या क्षेत्रातील विविध संधी हस्तगत करून आपण आपली एक वेगळी ओळख निर्माण करावी असे आवाहनही त्यांनी या प्रसंगी व्यक्त केले. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध क्षेत्रातील आदर्श महिलांचा सत्कार या प्रसंगी करण्यात आला. यात मनिषा पाटील, जयश्री भामरे, व रंजना भदाणे यांना आदर्श माता म्हणून सन्मानित करण्यात आले. राजकीय क्षेत्रात कार्यरत नगरसेविका रेखा सोनवणे, संगीता पानसार,उषा पवार,जयश्री फ्रगारिया, मनिषा देसले, संगीता भोसले यांचादेखील सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी आदर्श कन्या व माता म्हणून सौ. विद्या देवरे व सौ.तारा नांद्रे यांना सन्मानित करण्यात आले. आदर्श सून म्हणून डॉ. प्रिया देवरे, आदर्श पत्नी व बिझनेसवुमन म्हणून सौ.उज्वला सोनवणे, योगगुरू सारिका शिंदे, आदर्श शिक्षिका कविता देशमुख व आदर्श समाज सेविका म्हणून योगिता शाह यांचा सन्मान करण्यात आला.

ईशस्तवन व स्वागत गीताने सुरूवात झालेल्या या कार्यक्रमाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले. ज्याचे प्रास्ताविक वंदना जाधव यांनी, सूत्रसंचालन श्रीमती. अर्चना सोनार यांनी तर आभार प्रदर्शन सौ.वनिता सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. ज्योती वाकोडे, प्रा मालती सोनार तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमास साक्री शहरातील महिला व राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## Academic Year (2021-22)




व ग्रामसेवकांना नोटिसा बजावल्या आहेत. त्यात म्हटले आहे, ग्रामसभेने जबाबदारी संबंधित ग्रामपंचायतीवर राहील व अवैध उत्खनाबाबत कुसुंबा शिवारात २३ नोव्हेंबर २०२१ रोजी १०० ब्रास वाळूचा येईल, असेही या नोटिशीत नमूद करण्यात आले आहे.

# साक्रीतील पाटील महाविद्यालयात संविधानाचा जागर उपक्रम संपन्न



**साक्री, दि.२६ (प्रतिनिधी) – राजकीय, सामाजिक, वैचारिक गुलामगिरीतून भारतीयांना स्वतंत्र करण्याचे कार्य भारतीय संविधानाच्या माध्यमातून झाले. संवैधानिक तत्त्व आणि मूल्यांचे अनुकरण करून प्रत्येकाने आपली जीवन अनुसरावे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.राजेंद्र अहिरे यांनी केले.**

विद्या विकास मंडळाचे सी.गो. पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथे भारतीय संविधान दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभाग आयोजित भारतीय संविधानाचा जागर उपक्रमात ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून साक्री तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष विजय भोसले व प्रेस क्लबचे अध्यक्ष आबाजी सोनवणे, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अनंत पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाची पर्यवेक्षक प्रा.डी.पी. पाटील उपस्थित होते. प्राचार्य डॉ.अहिरे बोलताना पुढे म्हणाले की, संविधानाच्या प्रास्ताविकेचे [illegible]क वाचन आणि पाठांतर करून न थांबता त्यातील मूल्यांचे अवलंबन प्रत्येकाने आपल्या जीवनात केल्यास संविधान दिवस साजरा केल्याचे उद्दिष्ट प्राप्त होईल, असे मत व्यक्त केले. पत्रकारिता क्षेत्रातील कार्यामुळे विजय भोसले व आबाजी सोनवणे यांचा महाविद्यालयांनी भारतीय संविधानाची प्रत देऊन सत्कार केला. प्रसंगी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात येऊन विद्यार्थ्यांना प्रास्ताविकेच्या प्रती देण्यात आल्या. इयत्ता अकरावी विज्ञान च्या निशा रघुवीर परदेशी, पल्लवी नितीनकुमार तोरवणे, भावेश महेंद्र देसले, धीरज मच्छिंद्र ठाकरे या विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाच्या विविध विषयावर पोस्टर तयार करून त्यांचे सादरीकरण केले. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त 'संविधान जागर' या उपक्रमांतर्गत सी गो पाटील महाविद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल माध्यमिक विद्यालय, आदर्श माध्यमिक विद्यालय इत्यादी ठिकाणी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे च्या २५० प्रतींचे वाटप करून संविधाना विषयी जनजागृती करण्यात आली. प्रसंगी मुख्याध्यापक पोपटराव ढोले, मुख्याध्यापक डी.एन. पाटील, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यालयातील विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

Vidya Vikas Mandal's
**Sitaram Govind Patil Arts, Science and Commerce College, Sakri Tal. Sakri Dist. Dhule 424 304**

विद्या विकास मंडळाचे,
**सिताराम गोविंद पाटील कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, साक्री ता. साक्री जि. धुळे ४२४ ३०४**

NAAC ACCREDITED

Affiliated to Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

Website : www.sgpcsakri.com | Email : vidyavikas2006@rediffmail.com | Ph : 02568-242323

## Academic Year (2021-22)









**प्रमुख मार्गदर्शक**



मा यशवंत शितोळे
अध्यक्ष
महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र

**अध्यक्ष**



मा.डॉ राजेंद्र अहिरे
प्राचार्य,
सी गो पाटील महाविद्यालय,साक्री

# महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व विद्या विकास मंडळाचे सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## प्राचार्य आणि करियर कट्टा समन्वयक ऑनलाईन सहविचार सभा

दिनांक: ७/७/२०२१ | वार: बुधवार | वेळ: सकाळी १०.०० वाजता

zoom

Meeting Id: 842 7068 0878
Passcode: sgpc96

# प्रमुख अतिथी



मा प्राचार्य डॉ पी एच पवार
झेड बी पाटील महाविद्यालय, धुळे



मा प्राचार्य डॉ डी आर पाटील
आर सी पटेल महाविद्यालय, शिरपूर



मा प्राचार्य डॉ शारदा शितोळे
श्रीमती एच आर पटेल महाविद्यालय, शिरपूर



मा प्राचार्य डॉ एस टी सोनवणे
कर्म आ मा पाटील महाविद्यालय, पिंपळनेर



मा प्राचार्य हितेंद्र पाटील
बापूसाहेब शिवाजीराव देवरे अभियांत्रिकी महाविद्यालय, धुळे



मा प्राचार्य डॉ मनोहर पाटील
एस एस व्ही पी एस महाविद्यालय, धुळे



मा प्राचार्य डॉ पी एच पाटील
इन्स्टिट्यूट ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन, बोराडी



मा डॉ अनंत पाटील (उप-प्राचार्य)
सी गो पाटील महाविद्यालय, साक्री

# संयोजन



डॉ सचिन नांद्रे
समन्वयक,
करिअर कट्टा,धुळे जिल्हा



डॉ ज्ञानेश्वर चव्हाण
IQAC Coordinator
सी गो पाटील महाविद्यालय, साक्री



डॉ सचिन राणू गोवर्धने
समन्वयक,
सी गो पाटील महाविद्यालय, साक्री

**Registration link-**

https://docs.google.com/forms/d/1mf7vvXrk9m6MbY-Nq2ZBGaoN5CGK8omm2-2wmlu6kpw/edit?usp=drivesdk